# कृपा आणि वैभव

## ख्रिस्ताचे परमोच्च गौरव

लेखक -स्टीव्ह फर्नांन्डिस

अनुवाद – क्रॉसी उर्टेकर

# कृपा आणि वैभव

## ख्रिस्ताचे परमोच्च गौरव

### स्टीव्ह फर्नान्डिस

११ सप्टेंबर ला अमेरिकेत झालेल्या दुर्घटनेनंतर लॅरी किंग यांनी दूरदर्शनवर एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यात भिन्न विश्वास असलेल्या व्यक्तींना पाचारण करण्यात आले होते. त्यांना प्रश्न करण्यात आला की, या गोष्टी घडत असता देव कोठे होता? या व्यक्तींमध्ये "देवाला कसे ओळखावे" या प्रचंड खप असलेल्या पुस्तकाचे लेखक सॅनडिएगो चे दीपक चोप्रा हे सुद्धा होते. ते चोप्रा सेंटर फॉर वेल बीइंग चे सी इ ओ आणि संस्थापक देखील आहेत. ते देवाविषयीचा नवयुगाचा हिंदू दृष्टिकोन शिकवतात. ते स्वत: मात्र तसा दावा करत नाहीत. हॅरल्ड कुश्नेर नावाचे यहूदी रब्बी देखील त्यांच्यात होते. कुश्नेर यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी एक आहे: "देवाच्या लोकांच्या जीवनात जेव्हा अनिष्ट घटना घडते." हे गाजलेले पुस्तक लिहून बरीच वर्षे लोटलेली आहेत. मेहेर हेदाऊद नामक एक मुस्लीम पुढारी देखील त्यांच्यामध्ये होते. ते मुस्लीम पब्लिक अफेअर्स कौन्सिलचे वरिष्ठ सल्लागार आहेत. त्यांच्यामध्ये सुवार्तावादी पुढारी जॉन मॅकआर्थर हे देखील होते. ते कॅलिफोर्निया येथील ग्रेस कम्युनिटी चर्च चे पाळक आहेत आणि द मास्टर्स कॉलेज चे अध्यक्ष आहेत. प्रचंड खप असणाऱ्या अनेक पुस्तकांचे ते लेखक आहेत. शिवाय त्यांची रेडिओ प्रसारणाद्वारे देखील सेवा आहे.

या लोकांची चर्चा बरीच रंगली होती. अनेक मुद्यांवर ते परस्परांशी सहमत नव्हते. शेवटी आयोजक म्हणाले, "तुम्ही विविध विश्वासाचे हे पाहुणे बोलावले आहेत. अशा जहालमतवाद्यांमुळेच समस्या निर्माण होतात असे म्हणतात. आपण सर्व त्याविषयी बोलतो. पण ते कशाविषयीच सहमत होत नाहीत. अधिकारी कोण आहे याविषयीही यांचे एकमत नाही. त्या अधिकाऱ्याचे नाव आहे देव. आपण याकडे

अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. हा देव कोण आहे? तो देव आहे हे तुम्ही जाणताच.”

आयोजकाला प्रतिसाद देताना लॅरी किंग यांनी परिसंवादात भाग घेणाऱ्यांना प्रश्न केला, “देव कोण आहे?” तेव्हा जॉन मॅकआर्थर व ते मुस्लीम पुढारी यांच्यात या प्रश्नावर जी चर्चा झाली त्यावरून ख्रिस्ती जन ज्याला देहधारणाचा सिद्धांत म्हणतात तो किती महत्त्वाचा आहे हे सूचित होते. हा सिद्धांत देवाचा सार्वकालिक पुत्र मानव होण्यासंबंधी आहे. विशेष म्हणजे तो सिद्धांत असे शिकवतो की, देव मानव झाला आणि त्याचे नाव प्रभू येशू ख्रिस्त आहे. किंग यांनी जॉन मॅकआर्थर यांना प्रश्न विचारला की, “देव कोण आहे?” तेव्हा मॅकआर्थर म्हणाले -

“देवाविषयीच्या प्रश्नावर या सर्वांचे प्रतिसाद मी ऐकत आहे. पण आपल्या व्यतिरिक्त बाहेरच्या अधिकाऱ्याकडे आपण गेले पाहिजे. विश्वाच्या देवाची व्याख्या माझ्यासकट कोणीही करू शकत नाही. बायबलमधील देव विश्वाचा निर्माता, चालक व संगोपन करणारा आहे. तो सर्वांवर सार्वभौम आहे. तो येशू ख्रिस्ताठायी देहधारी होऊन आला. प्रायश्चित्ताच्या अर्पणासाठी तो स्वर्गातून खाली आला आणि वधस्तंभावर मरण पावला. त्यामुळे पश्चात्ताप करणाऱ्या सर्वांच्या पापाचा पूर्ण मोबदला भरून देण्यात आला. म्हणूनच त्यांच्यासाठी स्वर्ग खुला झाला. देवाच्या वचनातील देव असा प्रगट झाला.”

एक दोन लोकांनी यावर मत प्रदर्शन केल्यावर लॅरी किंग मुस्लीम पुढारी हेदाऊद यांच्याकडे वळले व त्यांना प्रश्न केला, “तुमचा या गोष्टीला काय प्रतिसाद आहे?” तेव्हा त्यांनी खालील उत्तर दिले, “मी देहधारी सिद्धांत सोडल्यास जॉन मॅकआर्थरशी पूर्णपणे सहमत आहे. कारण आम्ही देहधारी होण्यावर विश्वास ठेवत नाही. आमचा विश्वास आहे की देव काल, स्थळ अवकाशात हजर राहण्यापलीकडचा आहे. तो एखाद्या स्थळी बंदिस्त होऊ शकत नाही. तो अगम्य व अनाकलनीय आहे. तो शरीराने वास्तव्य करू शकत नाही.” तेव्हा किंग यांनी हेदाऊद यांना विचारले, “जॉन मॅकआर्थर यांना जसा ख्रिस्त वाटतो, तसा तुम्हाला महंमद वाटतो का?” हेदाऊद उत्तरले, “नाही”. जॉन मॅकआर्थरांसाठी ख्रिस्त देव

आहे. माझ्यासाठी ख्रिस्त देवाचा जासूद किंवा निरोप्या आहे. मग लॅरी किंग म्हणाले, “म्हणजे महंमदासारखा येशूही जासूद आहे असे तुम्हाला म्हणायचे काय?” त्यांनी उत्तर दिले, “हो, महंमदासारखा.”

देहधारी होण्याचे महत्त्व फुगवून सांगता येत नाही. पण देहधारी होऊन आलेल्या ख्रिस्ताचे व ख्रिस्ती विश्वासाचे एकमेव वेगळेपण सिध्द होते. तो मुस्लीम पुढारी मान्य करत होता की ख्रिस्ती धर्मविश्वास आणि इस्लाम व जगातील इतर धर्म यांच्यामध्ये एक महान दरी आहे. ते सर्व सारखे नाहीत. केवळ ख्रिस्ती धर्म विश्वासच शिकवतो की देव मानव होऊन या जगात आला आणि त्याचे नाव येशू आहे. मुस्लीम महंमदाविषयी असा दावा करत नाहीत किंवा शिकवत देखील नाहीत. जेव्हा ख्रिस्ती म्हणवणारे लोक सर्व धर्म सारखे आहेत असे विधान करतात तेव्हा मला खरोखर आश्चर्य वाटते. कारण सर्व धर्म सारखे नाहीत! मुस्लीम लोक देखील म्हणतील की सर्व धर्म सारखे नाहीत.

ख्रिस्ताने दावा केल्याप्रमाणे ख्रिस्ती धर्मविश्वास सांगतो की, ख्रिस्त देव आहे. देवाचे वचन आणि ख्रिस्ती धर्मविश्वास सांगतात की ख्रिस्त संदेष्टयांपेक्षा अधिक काही आहे. संदेष्ट्यांना ज्या देवाने पाठवले तोच देव तो आहे! हे जर खरे असेल तर महंमदीय विश्वास चुकीचा आहे कारण कुराणात म्हटले आहे की जो येशू देवाचा पुत्र आहे असा दावा करतो तो नास्तिक आहे; आणि त्याला शिक्षा झालीच पाहिजे.

## १. ख्रिस्ताचे देहधारण हा मंडळीचा पाया आहे आणि त्यातून ख्रिस्ताचे अत्युच्च गौरव प्रदर्शित होते.

प्रस्तावनेत आपण दोन गोष्टी पाहणार आहोत. त्या ख्रिस्ती विश्वासात देहधारणा ही केंद्रस्थानी असून तिचे महत्त्व दर्शवितात. पहिली गोष्ट म्हणजे ख्रिस्त हा सनातन देव असून तो मानव झाला हे सत्य मंडळीचा पाया आहे. हा पाया खडकासमान अढळ असून त्यावर सर्व काही उभारलेले आहे. जर खिस्त देहधारी होऊन आलेला देह नाही तर तो मानवास मुक्ती देण्यास पात्र नाही, त्याच्यात ती गुणवत्ता नाही. तो केवळ एक मानव आहे या मुद्यापाशीच सर्व उभारले जाऊन रचले जाते अगर

कोसळले जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, तुमच्या जिवात्म्याच्या अवस्थेसाठी आणि सदासर्वकाळ तुम्ही देवासमोर सादर होण्यासाठी ख्रिस्त या व्यक्तीचे आकलन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

दुसरी गोष्ट हे दर्शविते की देहधारणेचे महत्त्व हे ख्रिस्त या व्यक्तीचे गौरव करते. खिस्ताठायी  म्हणजे एकाच व्यक्तीत दोन भिन्न स्वभाव वसतात. एक स्वभाव सार्वकालिक, अमर्याद व सर्वसमर्थ आहे; म्हणजे देवाचाच स्वभाव प्रत्यक्ष त्याच्या ठायी आहे. आणि दुसऱ्या स्वभावाची काळाने सुरुवात झाली. तो मर्यादित व सीमित असून स्थळाशी निगडित आहे; म्हणजे तो मानवाचा स्वभाव आहे. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की ख्रिस्ताच्या मानवी स्वभावाला आरंभी मानवी व्यक्तिमत्त्व नव्हते. सार्वकालिक देवाचा पुत्र, ज्याला आरंभ नाही त्याचे व्यक्तिमत्व मानवी स्वभावाला दिले. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर ती केवळ एकच अशी व्यक्ती आहे. ही एक व्यक्ती देवाचा सार्वकालिक पुत्र देहधारी झाल्यामुळे आहे. ती व्यक्ती एकाच वेळी या दोन स्वभावांनी अस्तित्वात आहे. त्याच्यासारखी दुसरी एकही व्यक्ती नाही.

कलसै १ मध्ये ख्रिस्त ह्या व्यक्तीच्या गौरवावर उहापोह केला आहे, त्याकडे आपण पाहू या; मग मी त्याचे स्पष्टीकरण करीन. कलसै १:१६ म्हणते, “आकाशात व पृथ्वीवर असलेले, दृश्य व अदृश्य असलेले राजे, अधिपती सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले ते सर्व त्याच्यामध्ये उत्पन्न झाले; सर्व त्याच्याद्वारे व त्याच्यासाठी उत्पन्न झाले.” हे गौरव ख्रिस्ताच्या दैवी व्यक्तिमत्वाचे वर्णन करते. तो निर्माणकर्ता देव आहे. त्याने किती व काय काय निर्माण केले? सर्व! म्हणजे सर्व काही! शिवाय तो सनातन देव आहे. कलसै १:१७ मध्ये म्हटले आहे; “तो सर्वांच्या पूर्वीचा आहे व त्याच्यामध्ये सर्व समाविष्ट होतात. निर्माता असल्याने प्रत्यक्षात निर्मिती होण्यापूर्वीच्या काळापासून तो आहे. तो सनातन आहे. तो विश्वाच्या पूर्वीचा आहे. ‘त्याच्यामध्ये सर्व समाविष्ट होतात’ म्हणजे ख्रिस्ताने सर्व काही निर्माण तर केलेच पण त्या सर्वांची तो देखभाल व जोपासना करतो. आणि आता या क्षणीही तो सर्वांना चालवतो. या सर्व गोष्टींतून त्र्येकत्वातील दुसरी व्यक्ती असणाऱ्या ख्रिस्ताचे देवत्व, दैवी स्वभाव व दैवी अस्तित्व व्यक्त होते.

त्यानंतर पौल ख्रिस्ताच्या मानवत्वाबद्दल बोलतो. कलसै १:१८ मध्ये म्हटले आहे, "तोच शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे. तो आदि, मृतांतून प्रथम जन्मलेला आहे." हे येशूच्या मानवी शरीराच्या पुनरुत्थानाच्या संदर्भात म्हटले आहे. ख्रिस्त मानव झाला मानवाप्रमाणे मरण पावला. आणि मानव म्हणूनच मानवी शरीराने मेलेल्यांतून परत उठला! या सत्यावरून सिद्ध होते की तो देवही आहे व मानवही आहे. सर्व गोष्टीत प्रथम स्थान प्राप्त व्हावे म्हणून तो आला. तो सर्वश्रेष्ठ आहे. त्याच वचनात पौल पुढे म्हणतो, "अशासाठी की सर्वांमध्ये त्याला प्राधान्य मिळावे" (कलसै १:१८ ब ). ख्रिस्त सर्वांहून परमोच्च आहे. जरी तो मानव आहे तरी तो देवमानव आहे ! आणि देवमानव म्हणून ख्रिस्त अत्युच्च गौरवी आहे!

## २. ख्रिस्ताच्या देहधारणाचे तिहेरी गौरव

### अ) त्याच्या व्यक्तित्वाच्या रचनेतील गौरव

आपण आता ख्रिस्ताच्या देहधारित व्यक्तित्वामधील तिहेरी गौरव पाहणार आहोत. पहिले म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाच्या रचनेतील गौरव. येशू त्याच्या देहधारणामुळे पूर्णपणे एकमेव अपवादात्मक व्यक्ती असा घडला गेला. याचा अर्थ काय? याचा अर्थ, तो जरी एक व्यक्ती असला तरी दोन भिन्न स्वभाव धारण करतो. मी आधी म्हटले आहे की ख्रिस्ताच्या मानवी स्वभावाला व्यक्तिमत्व नव्हते म्हणून नासरेथकर येशू नामक व्यक्तीवर विशेष प्रकारे देव उतरून आला असे नव्हे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर देव आणि येशू अशा त्या दोन व्यक्ती नाहीत. तर तो एकच व्यक्ती आहे. ती व्यक्ती खुद्द देव आहे. त्याने स्वत: मानवी स्वभाव धारण केला आणि त्या स्वभावाला व्यक्तिमत्व दिले. अशा प्रकारे या सनातन देवाने नवीन अस्तित्व धारण केले. मानव म्हणून अस्तित्व धारण केले.

अनेक शास्त्रलेख हा मुद्दा स्पष्ट करतात. उदाहरणार्थ शुभवर्तमानात आपल्याला स्पष्ट सांगितले आहे की, "मरीया पवित्र आत्म्याने गरोदर कलेली अशी दिसण्यात आली. जो जन्मला त्याला पवित्र, देवाचा पुत्र असे संबोधण्यात आले"

(लूक१:३५). तो स्त्रीलिंग अथवा पुल्लिंग असा मूळ भाषेत दर्शविलेला नाही. याचा अर्थ मरीयेतील पिंडाला अजून व्यक्तिमत्व नव्हते असे सूचित होते. एका कोणत्या तरी विशिष्ट समयी आपल्याला नक्की सांगितले नाही अशा वेळी ख्रिस्त आला आणि मरीयेच्या उदरातील शरीराचा ताबा घेऊन त्याला व्यक्तिमत्व दिले. पुढे इब्री १०:५ मध्ये येशूविषयी म्हटले आहे की, "तो जगात येते वेळेस म्हणाला...तू माझ्यासाठी शरीर तयार केले आहे." हे लक्षात घ्या की आधी शरीर तयार करण्यात आले नंतर सनातन पुत्राने त्याचा ताबा घेतला. देवाचे वचन असेही सांगते की मरीया त्याला स्तनपान करीत असताना त्याने देवावर विश्वास ठेवला. स्तोत्र २२:९ मध्ये म्हटले आहे, "मी आपल्या आईच्या अंगावर पीत होतो तेव्हा तू मला आपणावर भाव ठेवण्याची स्फूर्ती दिली." स्पष्टच आहे की मरीया त्याला स्तनपान देत असतानाच आपण कोण आहोत याविषयी त्याला पूर्ण जाणीव होती! नवजात बाळक असतानाच तो सर्व काही जाणणारा, सर्वज्ञ, सनातन देव असाच राहिला. मानवी स्वभावाने मात्र तो वाढून मोठा झाला व शिकला. परंतु त्याच्या दैवी स्वभावाने जो स्वभाव त्याच्या ठायी पूर्वीपासूनच होता त्या स्वभावानुसार त्याला काहीच शिकावे लागले नाही.

या अनुषंगाने विचार करीत असता देवाचे वचन असे शिकवते की, प्रभू येशू लोकांचे विचार ओळखून त्यांच्या वैचारिक जीवनावरून त्यांना प्रतिसाद देत असे. तो आपल्या सार्वकालिक, सर्वज्ञ, दैवी गुणवैशिष्ट्यानुसार नेहमी बोलत असे. उदाहरणार्थ एका पापी स्त्रीला सुगंधी द्रव्याने येशूच्या चरणांस तैल्याभंग केल्यास परवानगी दिली म्हणून एका परूश्याने त्याच्यावर टीका केली. लूकामध्ये नोंद आहे की त्या परूश्याने आपल्या मनात म्हटले; "हा संदेष्टा असता तर याला शिवत असलेली स्त्री कोण व कशी आहे, म्हणजे ती पापी आहे हे याला कळले असते" (लूक ७: ४०). येशू त्याचे विचार ओळखून त्याच्या वैचारिक जीवनावरून त्याच्याशी बोलला. असे घडल्याने काय होते याची कल्पना तुम्हाला येते का?

केवळ उदाहरणादाखल कल्पना करा की, नवे कपडे घालून तुम्ही चर्चला आला. तुम्ही आपल्या मित्राकडे पाहून मनात विचार करता, याला माझा आजचा पेहराव आवडला असे वाटत नाही, आणि ती व्यक्ती वळून तुम्हाला म्हणते, "अरे, मुळीच

नाही; मला तुझा पेहराव खरंच खूप आवडला." तुम्ही तर फक्त मनातल्या मनात विचार केला होता आणि तरी ती व्यक्ती जणू तुम्ही त्याच्याशी प्रत्यक्षात बोलल्याप्रमाणे तुम्हाला उत्तर देते! यामुळे तुम्ही किती भयग्रस्त व्हाल! ख्रिस्ताने अगदी असेच केले. लोकांचे विचार ओळखून येशू त्यांच्याशी संवाद साधत असे.

म्हणून तो अशीच एक व्यक्ती आहे, तो दैवी सार्वकालिक पुत्र आहे. त्यानेच मानवी स्वभावाला व्यक्तिमत्व दिले. मी अनेकदा उल्लेख केल्याप्रमाणे 'देवाचा पुत्र' या शीर्षकाचा ख्रिस्ताला आरंभ आहे असा अर्थ होत नाही. तर त्याला अगदी पित्यासारखाच तंतोतंत स्वभाव आहे असा त्याचा अर्थ होतो. हा अभ्यास करीत असताना आपण यावर खोलवर अभ्यास करू. अशा प्रकारे ख्रिस्ताचे व्यक्तिमत्व एकमेव व अपवादात्मक आहे व त्यातून त्याचे गौरव होते. त्याने स्वत:वर मानवी स्वभाव धारण केला तरीही त्याचवेळी तो सनातन देवाचा पुत्र राहिला हेच तर आश्चर्य आहे.

आता योहान १:१ मध्ये योहान ख्रिस्ताविषयी काय म्हणतो ते लक्षात घ्या. "प्रारंभी शब्द होता. शब्द देवासह होता आणि शब्द देव होता." योहान उत्पत्तीकडे जायला सांगतो. अर्थातच तुम्ही म्हणाल, उत्पत्ती १:१नुसार देवाने आकाश व पृथ्वी ही निर्माण केली आणि त्याचाच उल्लेख ह्या वचनात आहे यात शंकाच नाही. त्या उत्पत्तीच्या घटनेकडे जा. विश्वाचा आरंभ, प्रत्यक्ष निर्मितीचा आरंभ...आणि तेथे शब्द होता! 'शब्द होता' असे योहान म्हणतो –तो आधीपासूनच अस्तित्वात होता. मूळ ग्रीक भाषेमध्ये इंग्रजीत वापरल्याप्रमाणे 'द' या आरटीकलचा वापर न करता 'इन बिगीनिंग' असे म्हटले आहे. 'इन द बिगिनिंग' असे इंग्रजीप्रमाणे लिहिलेले नाही. यामुळे योहान 'प्रारंभी' म्हणताना ज्ञात असलेल्या एका विशिष्ट बिंदूपाशी सुरुवात झाल्याबद्दल बोलत नाही. तर तो कोणत्या तरी एका प्रारंभाविषयी बोलतो. इंग्रजीत आपण 'द' आरटीकल वापरून एक निश्चित गोष्ट सूचित करतो. उदाहरणार्थ एखाद्याची बायको म्हणते, "मी तुम्हाला त्या बँकेत भेटेन." तेव्हा कोणत्या बँकेत ते पतीला ठाऊक असते. त्या बँकेत ते नियमितपणे भेटत असतात. त्याशिवाय त्या 'द' बँकेत असे ती म्हणणार नाही. पण जर ती म्हणाली मी तुम्हाला एका बँकेत भेटेन तर तो म्हणेल, "एक मिनिट थांब. गावात एवढ्या बँका आहेत. मला नक्की

कोणत्या बँकेत भेटशील ते सांग.” योहान देखील प्रारंभी  हा शब्द वापरताना कोणत्या बिंदूपाशी प्रारंभ, हे सांगत नाही. म्हणून तो विशिष्ट सुरुवातीविषयी बोलत नाही. तर ज्या कशाला तुम्ही प्रारंभ म्हणाल अशाविषयी बोलतो. हाच अगदी ठामपणे व्यक्त करणारा मुद्दा ठरेल की ख्रिस्ताला आरंभ नाही. त्या पूर्वी ख्रिस्त होताच असे आढळेल. म्हणजे तो त्या पूर्वीच आहे. कोणत्याही आणि सर्व प्रारंभापूर्वी तो सतत अस्तित्वात आहे. त्याला स्वत:ला प्रारंभच नाही. तो सनातन आहे सदासर्वकाळ आहे असे सांगण्याचा हा एकच पक्का, उत्कट मार्ग आहे. शिवाय योहान म्हणतो ख्रिस्त देवासह होता. हे पित्याच्या संदर्भात म्हटले आहे. ‘सह’ हा प्रत्यय त्याची पित्याशी सर्वकाळ असलेली सहभागिता असल्याचे सूचित करतो. म्हणून देहधारणाचे महान सत्य हेच आहे की : जो सार्वकालिक पुत्र, प्रारंभ नसलेला, सतत अस्तित्वात असलेला, तो जगात येण्यासाठी जाणीवपूर्वक कृतीशील झाला आणि मानवी स्वभावाशी जडून जावे म्हणून त्याने मानवी देह स्वरूपाचा देह धारण केला. योहान १:१४ मध्ये आपण पाहतो की योहान म्हणतो, “शब्द देही झाला आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली.”

आपण यशया ७ व ९ अध्यायांकडे अवलोकन करून त्यातील प्रसिध्द भाकितांचा अभ्यास केला तर जास्त सहाय्यकारी होईल. प्रथम यशया ९:६ मध्ये म्हटले आहे, “कारण आम्हासाठी बाळ जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे.” येथे आपल्याला कळविले आहे की, “एक बालक जन्मेल...तो पुत्र ...दिला जाईल.” पुढे काय म्हटले आहे ते नीट पाहा. “त्याला अद्भुत ...म्हणतील.” याचा अर्थ ती व्यक्ती अद्भुत असेल. आश्चर्यकारक असेल, वैशिष्ट्यपूर्ण असेल आणि एका अपवादात्मक आश्चर्याने युक्त असेल. त्याला अद्भुत ठरवणारी बाब म्हणजे त्याचे देहधारण होय. तो मनुष्यांमध्ये देवमानव  असणार. त्याला सर्वसमर्थ देव, सनातन पिता आणि शांतीचा अधिपती म्हणतील, असे पुढे म्हटले आहे. ते बालक सर्वसमर्थ देव आणि सनातन पिता आहे. लक्षात घ्या, हे एकाच व्यक्तीविषयी म्हटले आहे, दोन व्यक्तींविषयी नव्हे. हे एकच बालक सर्वसमर्थ देव व सनातन पिता आहे. किती नवलाची गोष्ट! इब्री २:२४ मध्ये म्हटले आहे, “ज्याअर्थी मुले एकाच रक्तमांसाची होती त्याअर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला.” याचा अर्थ

त्याच्या इच्छेने त्याने मनुष्य होण्याचे निवडून तशी कृती केली. तो मानवी स्वभावाने जसा अस्तित्वात आहे तसाच तो दैवी स्वभावाने अस्तित्वात आहे. त्या स्वभावांद्वारे व त्या स्वभावांमध्ये तो अस्तित्वात आहे. जेव्हा तो मानवी स्वभावाने अस्तित्वात आहे तेव्हा तो दैवी स्वभावात असून दैवी स्वभावाने कृती करण्याचे थांबवत नाही. एकाच वेळी तो दोन्ही स्वभावांनी अस्तित्वात असतो.

याचा अर्थ तो जेव्हा पृथ्वीवर बसलेला असून भोजन करीत असतो; मानवांशी एखाद्या विषयावर चर्चा करीत असतो, त्याच वेळी विश्वात व जगात सर्वत्र काय चालले आहे याचे ज्ञान त्याला असते. जरी तो मानव असला तरी तो सर्वज्ञ, सर्वोपस्थित असल्याचे थांबत नाही. तो कोठे भेटीदाखल बसलेला असताना जगातील सगळीकडील सर्व गोष्टींवर व संपूर्ण विश्वावर नियंत्रण करीत असतो. मानवी देह असल्याने त्याला भूक लागते, तहान लागते, त्रास होतो; पण त्याच वेळी त्याच्या ठायी दैवी स्वभाव देखील असतो. त्याद्वारे तो सर्व काही जाणतो व सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवतो. तो सर्वांवर नियंत्रण ठेवतो आणि सर्वांची काळजी घेतो. त्याच वेळी तो एकटा बसलेला असतो अगर भेटी घेत असतो. हे खरोखर अद्भुत विलक्षण आहे! त्याला अद्भुत संबोधणेच रास्त आहे! दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्याच्या मानवी देहातून दिसणारे त्याचे नेत्र फक्त मानवी व्यक्तीचे नेत्र नाहीत. तो मानवी देह मानवी नेत्रांसह असला तरी तुमच्याशी संपर्क साधणारी ती व्यक्ती डोळ्यांना नवचैतन्य देणारी आहे. शरीराला नवचैतन्य देणारी व्यक्ती आहे. ती व्यक्ती म्हणजे प्रारंभ नसलेला तो पुत्र आहे . खरोखर तो किती गौरवी आहे!

फिलीपै २ मध्ये हाच मुद्दा चर्चिलेला दिसतो. फिली. २:८ मध्ये म्हटले आहे की; "(तो) मनुष्यप्रकृतीचा असा प्रगट होऊन त्याने मरण आणि ते ही वधस्तंभावरचे मरण सोसले, येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वत:ला लीन केले." त्याने गुन्हेगाराचे मरण सोसले. सनातन, सार्वकालिक देव मेला ! हा विचारच स्तंभित करून सोडणारा आहे. मग स्वर्गाने आणि सूर्यानेही त्याला प्रतिसाद दिलाच पाहिजे. आणि त्यांनी प्रतिसाद दिलाही ! सूर्य व आकाश अंधारून गेले. पृथ्वीनेही प्रतिसाद दिला पाहिजे म्हणून पृथ्वी कांपली. तो खरोखर अद्भुत आहे. तो तुमचा तारणारा आहे. पण जर तुम्ही त्याच्याकडे वळून माघारे आला तरच ! तो तुमचा मित्रही आहे.

तो सर्व सामर्थ्याने युक्त आहे. तो ज्ञानी आहे. त्याच्या मनात तुमच्याविषयी उत्तम सदिच्छा आहेत. त्याचा पुरावा त्याने वधस्तंभावर दिला यात काही शंकाच नाही.

दुसरी गोष्ट, त्याने मानवी देह धारण केला. याचा अर्थ, आता ऐक्य आहे (काहीशी पुनरावृत्ती वाटेल). म्हणजे एका व्यक्तीमध्ये दोन स्वभावांचे मीलन झाले आहे. यशया ७:१४ मध्ये म्हटले आहे; "यास्तव प्रभू स्वत: तुम्हांस चिन्ह देत आहे: पहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल...ती त्याचे नाव इम्मान्युएल ठेवील." कुमारीला पुत्ररत्न असलेले बालक होईल. तो इम्मानुएल म्हणजे 'आम्हाबरोबर देव' असा असेल. म्हणजे असे भाकीत केले होते की देवमानव होईल. बायबलमध्ये याविषयी कितीतरी भाकिते आहेत. आता येथे ऐक्य, मीलन झालेले दिसते. त्याने मानवी देह धारण केल्यामुळे त्याच्या मानवी स्वभावाचे व त्याच्या दैवी स्वभावाचे अशा या दोन स्वभावांचे मीलन झाले. ह्या दोन स्वभावांची सरमिसळ झाली नाही किंवा त्यांची परस्परांत गुंतवणूक झाली नाही. किंवा त्या दोघांमुळे एक नवीनच स्वभाव निर्माण झाला असेही घडले नाही आणि असे कधी ऐकलेही नाही. दोन्ही स्वभावांचे स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यांचा संयोग झाला नाही. योहान ८:५८ मध्ये येशू स्वत:विषयी म्हणतो; "अब्राहाम झाला त्यापूर्वी मी आहे." तो खरे तर म्हणत आहे की – त्याचा जन्म ३० वर्षांपूर्वी झाल्याचे त्या लोकांना माहीत होते. त्यानुसार त्याला ३० वर्षांपूर्वी मानवी स्वभाव प्राप्त झाला, परंतु दुसरा स्वभाव त्याच्या ठायी अब्राहाम झाला त्यापूर्वीच होता. अब्राहाम झाला त्यापूर्वी मी आहे म्हणजे त्याच्या काळी २००० वर्षांपूर्वीही तो अस्तित्वात होता. तो एकच व्यक्ती आहे पण त्याच्या ठायी दोन स्वभावांचे ऐक्य, मीलन झाले आहे. तो दोन्ही स्वभावांमध्ये राहून दोन्ही स्वभावांशी कृतिशील राहू शकतो, तरीही हे दोन स्वभाव कधीच परस्परांत गुंतून जात नाहीत. याचा अर्थ त्याला भूक लागते, तो खातो आणि भूक लागली म्हणून जेवतो. तो तुमचे मन वाचू शकतो. तो थकून झोपतो. तो थकला होता म्हणूनच तारवात झोपला होता. तरीही तो उठतो आणि खवळलेल्या समुद्राला "उगा राहा आणि शांत हो" म्हणताच समुद्रही अगदी निवांत होतो. येथे तो आपल्याला मानवी स्वभावाने तारवात झोपलेला आणि आजूबाजूला काय चालले आहे हे न समजल्याने कसलीही पर्वा न करणारा दिसतो. तो उठतो आणि भयग्रस्त

कोळ्यांकडे पाहतो. त्या सरोवरावर या कोळ्यांनी आपले आयुष्य काढले होते. तो समुद्राला म्हणतो, "उगा राहा." मग शिष्यांकडे वळून म्हणतो, "तुम्ही का भयभीत झालात?" जणू तो म्हणतो, "तुम्हांला माहीत नाही का, की मी झोपलेला असतो तरीही मी झोपलेला नसतो? मला झोप लागत नाही व मी डुलकीही घेत नाही" (स्तोत्र १२१)? एका व्यक्तीने मला चिठ्ठी पाठवली की आज बिछान्यावर झोपण्यापूर्वी प्रार्थना कर कारण रात्रभर देवबाप जागा असणार आहे. ख्रिस्त त्याच्या दैवी स्वभावानुसार कधीच थकत नाही. आणि तुम्ही कोणत्या प्रसंगातून जात आहात याची त्याला पूर्ण कल्पना असते.

म्हणून खिस्ताच्या या दैवी व मानवी ऐक्यात हे दोन्ही स्वभाव भिन्न राखले आहेत. दैवी स्वभाव बदलू शकत नाही. तो निर्भय, निर्धास्त आहे. तो फिरून छायेत जात नाही. तो बदलत नाही. बायबल स्पष्ट करते की, दैवी स्वभाव म्हणजे देवाचा स्वभाव बदलत नाही. म्हणून ख्रिस्ताने देखील तो स्वभाव गमावलेला नाही. त्याच्या ठायी देवाचा स्वभाव असतोच देवाचे सर्व गुणविशेष पूर्णत्वाने व परिपूर्णतेने त्याच्या ठायी आहेत. त्याच्याच जोडीला तो मानवी स्वभावही बाळगतो.

कलसै. २:९ मध्ये पौल म्हणतो, "ख्रिस्ताच्या ठायी देवाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते." पौलाची भाषा काळजीपूर्वक लक्षात घ्या. 'सर्व' हा शब्द वापरण्याची त्याला आवश्यकता नव्हती. त्याच्या ठायी दैवत्वाची पूर्णता मूर्तिमान वसतेच. 'पूर्णता' म्हटले की तुम्हाला गरज वाटेल ते सर्व. तुम्हाला आणखी कशाची गरज नाही. 'सर्व पूर्णता' हे धार येण्यासाठी वापेलेले शब्द आहेत. ते ज्या गोष्टीवर भर देण्यासाठी वापरले आहेत, तो उद्देश आपल्याकडून निसटून जाऊ नये. किंवा आपण तो चुकवू नये. जोर देऊन ठामपणे सांगण्याची ती एक पद्धत आहे. त्यानुसार तो म्हणतो की, दैवत्वाची सर्व पूर्णता म्हणजे दैवी स्वभाव त्याच्या ठायी त्याच्या ठायी म्हणजे त्या दैहिक स्वरूपाच्या शरीरात वसत होता. दैवी गुण पूर्णत्वाने त्याच्या ठायी त्या मानवी शरीरात वसत होता आणि सर्व गुणविशेष त्याच्या सेवेस हजर होते. ही किती नवलाईची बाब आहे !

म्हणूनच ख्रिस्ती व्यक्ती गीते गाते. कोणी म्हणतात, हे ख्रिस्ती लोक असे काय सतत गात असतात? आमच्या मंडळीविषयीही लोक असे म्हणतात. ते कसे बरे गायचे थांबतील? तुम्ही गाऊ लागेपर्यंत ते थांबणार नाहीत. चला वाजवा. हा महान अद्भुत तारणारा आला आहे. त्याने आम्हांला मुक्ती दिली आहे. त्याने आम्हांला सोडवले आहे. आम्हांला त्याच्याप्रीत्यर्थ गीते गायलाच हवीत! अशा प्रकारे आपण पाहतो की तो आपल्या एकाच व्यक्तिमत्वात हे दोन भिन्न स्वभाव जतन करतो. एकच व्यक्ती दोन्ही स्वभावांनिशी कार्यरत राहील. हे दोन स्वभाव विभक्त होऊ शकत नाहीत. ती पाण्याचा द्राक्षारस होण्यासारखी बाब नाही. मानवी स्वभाव भिन्न आहे आणि दैवी स्वभाव भिन्न आहे. तरी एकच व्यक्ती ते दोन्ही स्वभाव धारण करून कार्यरत ठेवते ही नवलाची बाब आहे! याचमुळे तो सर्वोच्च आणि स्तुतीस पात्र ठरतो. म्हणून पौल म्हणतो, ‘त्याला प्रथम स्थान आहे.’ यशया म्हणतो, ‘त्याला अद्भुत म्हणतील.’ आश्चर्ययुक्त - होय आश्चर्याने भरलेला! म्हणूनच त्याच्या एकमेव व्यक्तिमत्वाच्या रचनेमुळे तो असा गौरवी आहे.

## त्याच्या अत्युच्च पदावरून त्याने केलेल्या मेहेरबानीमध्ये त्याचे गौरव.

देव म्हटलेल्या परमोच्च पदावर असताना त्याने केलेल्या मेहेरबानीमुळे तो गौरवी ठरतो. फिलीपै २:५ मध्ये म्हटले आहे, “असली जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूमध्ये होती ती तुम्हांमध्ये ही असो.” ह्या शास्त्रभागाविषयी आपण लक्षात ठेवावे की आपण ख्रिस्ती या नात्याने स्वत:पेक्षा इतरांना श्रेष्ठ का मानावे व महत्त्व का द्यावे आणि स्वत:चेच हित पाहू नये, याविषयीचे स्पष्टीकरण ही वचने देतात (फिली.२:३,४ वाचा). वचन ५ व ६ मध्ये म्हटले आहे, “असली जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूमध्ये होती ती तुम्हांमध्येही असो. तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवासमान असणे हा लाभ असा त्याने मानला नाही.” स्वरूपाचा याचा अर्थ त्याच्या ठायी देवाचा पूर्ण स्वभाव वसत असून तो त्याच्या अंगी होता. ही परिभाषा गौण व दिसणाऱ्या बाह्यस्वरूपापेक्षा अधिक संदर्भ देते. हे स्वरूप स्वाभाविक मूळ वास्तवता प्रतिबिंबित करते. या शब्दापासून रूपांतर हा शब्द आपल्याला सापडतो. जसे

सुरवंटापासून फुलपाखरू तसे काहीतरी त्याच्या मूलभूत स्वभावात बदलल्याच्या संदर्भात तो शब्द आहे. ख्रिस्त देवाच्या स्वरूपात होता. तो त्याचा मूळस्वभाव होता. हे वचन ६ व ७ मध्ये सिद्ध केले आहे. तेथे असे म्हटले आहे "देवासमान असणे हा लाभ असे त्याने मानले नाही तर त्याने स्वत:ला रिक्त केले." असा अनुग्रह करून उच्च पातळीवरून आपण खालच्या पातळीवर येत आहोत असे त्याने दाखवून दिले. त्यातून त्याची नम्रता प्रदर्शित होते. जरी तो खरोखर देव होता, अमर्याद वैभवी परमोच्च पदी होता, तरी आपण देवासमान आहोत हा लाभ आहे असे त्याने मानले नाही तर त्याने स्वत:ला रिक्त केले. आणि मनुष्याच्या प्रतिमेचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले. देव असण्यापासून त्याने स्वत:ला रिक्त केले नाही. देव म्हणून त्याच्यामध्ये काहीही फेरफार होऊ न शकणारा व न बदलणारा असा तो आहे. देव असे स्वत:ला सादर करण्यापासून व देव म्हणून कसलीही भक्ती स्वीकारण्यापासून त्याने स्वत:ला रिक्त केले. थोडक्यात सांगायचे म्हणजे त्याने आपल्या गौरवावर आच्छादन घेतले.

आता त्याच्या अनुग्रहामुळे वरच्या पातळीवरून खालच्या पातळीवर आगमन करण्याच्या त्याच्या थोर कृतीमागे आपण त्याची प्रेरणा पाहतो. वचन ७ म्हणते की "त्याने स्वत:ला रिक्त केले." त्यात त्याने स्वत: पुढाकार घेतला. त्याच्यावर कोणतीही गोष्ट बळजबरीने लादण्यात आली नाही. त्याने गरजेपोटी काही केले नाही. ते त्याच्या अंतर्यामातून स्फुरले. अत्यंत दीन, क्षुल्लक आणि अपात्र अशा मानव प्राण्यांसाठी त्याच्या प्रीतीने व दयेने गळ घालून सक्ती केली. ही त्याची प्रेरक शक्ती होती. कृपा बहाल करून उच्च स्थानावरून नीच स्थान धारण करण्यामधील त्याची तेजस्वी व उच्च गुणवत्ता लक्षात घ्या. तो देवाच्या स्वरूपात होता म्हणजे त्याच्या अस्तित्वाच्या संपूर्ण गाभ्यात पूर्णपणे त्याच्या ठायी देवाचा स्वभाव वसत होता आणि व्यक्त होत होता. आपले स्थान आणि त्याची परमोच्च अवस्था यामध्ये अमर्याद अंतर आहे. अमर्याद याचा अर्थ अतुलनीय किंवा प्रमाणाबाहेर. तुम्ही कशाशी तुलना करायची म्हटल्यास तुलना करण्याजोगे काहीतरी कायदेशीर अस्तित्वात असायला हवे ना ! तुम्ही थोर खेळाडूंमध्ये तुलना करू शकता. पण एका महान बास्केटबॉल खेळाडूची जो बॉल हाताळूही शकत नाही अशा व्यक्तिशी

तुलना करू शकत नाही. किंवा एखाद्या फुटबॉल खेळाडूची जो पळूही शकत नाही अशा व्यक्तिशी तुलना करू शकत नाही. काही बाबतीत आपण तुलना करूच शकत नसतो. तो इतका अमर्याद वा आपल्यापेक्षा इतक्या मोठ्या उंचीवर आहे की बायबल सांगते की त्याची कशाशीच तुलना होऊ शकत नाही. आपली सर्व थोरवी त्याच्यासमोर काहीच नाही. यशया म्हणतो की राष्ट्रे त्याच्यासमोर बादलीतील बुडबुड्याप्रमाणे आहेत. ती त्याच्यापुढे किडे किंवा टोळांसमान आहेत. त्याच्या तुलनेसाठी प्रमाणच नाही. तो अमर्याद परमोच्च असा आहे.

तुम्ही पसिफिक समुद्रकिनाऱ्यावरील पर्वत रांगांची इतर डोंगरांबरोबर तुलना करू शकता. खरे तर त्यातील फारच थोड्या डोंगरांना खऱ्या अर्थी पर्वत म्हणता येते. टॅमाल्पाइसला तर डोंगर म्हणताच येणार नाही. तर डियाबलो डोंगर डोंगरापेक्षाही मोठा आहे. परंतु तुम्ही त्याची सियेराशी तुलना केली तर ते खरे तर डोंगरच नाहीत. मध्य पश्चिमेचे लोक तिथे भेट देऊन आल्यावर म्हणतात, 'वलेहो मधील डोंगर म्हणजे खरंच काही विशेषच आहेत.' काही लोक असेही म्हणताना मी ऐकलंय की, 'पर्वतराजीत वास्तव्य करण्यातील मजा काही औरच असते.' कल्पना करा की वलेहो गाव हे पर्वत राजीसाठी प्रसिद्ध आहे. मग मी त्यांना म्हणतो की "मी तुम्हाला सियेराला नेतो म्हणजे खरे डोंगर काय हे तुम्हाला समजून येईल." म्हणजे तुम्ही किनारपट्टीवरील डोंगरांची सिएराशी तुलना करू शकता. पण तुम्ही सिएराची हिमालयाशी तुलना करू शकत नाही. माउंट व्हिटनाची देखील हिमालयाशी तुलना होऊ शकणार नाही. पण मग तुम्ही अवकाश यानात बसून पृथ्वीला प्रदक्षिणा घातली तर एकही डोंगर तुमच्या दृष्टोत्पत्तीस पडणार नाही. मग एकाची दुसऱ्याशी तुलना करताना फारसा फरक लक्षात येणार नाही. तेथून पृथ्वीचा गोल सपाट वाटतो. देव म्हणतो, "तुम्ही माझी कोणाशी तुलना कराल? सर्व राष्ट्रे तर बादलीतील बुडबुड्याप्रमाणे आहेत." काही प्रमाणच नाही. आणि बायबल सांगते की आपल्याकडे नजर टाकायला त्याला लवून वाकून झुकावे लागते. केवळ पृथ्वीवर येणे एवढेच त्यात अभिप्रेत नाही. तर आपली दखल घेणे ही गोष्टही तितकीच महत्त्वाची आहे. ते ही कोणा थोर व्यक्तीसाठी खाली झुकून वाकणे नव्हे तर आपल्या सारख्यांची दखल घेण्यासाठी खाली झुकून तो वाकतो ना? कोणा थोर

व्यक्तीला आपण आहोत कोण याची कल्पनाही नसेल किंवा ते आपली दखलही घेणार नाहीत. त्यांनी येथे आपल्याप्रत येणे तर दूरच राहिले. देव म्हणतो आपली दखल घेण्यासाठी तो खाली झुकून वाकला यासाठी की त्याने एकट्याने आपल्याबरोबर राहावे.

स्तोत्र ११३ : ५,६ मध्ये म्हटले आहे, “परमेश्वर आमचा देव याच्यासारखा कोण आहे? तो उच्च स्थानी सिंहासनारूढ आहे. तो आकाश व पृथ्वी यांचे अवलोकन करण्यास लवतो. स्वर्ग पृथ्वीपेक्षा महान आहे. आणि तो म्हणतो की, पृथ्वीमध्ये काय चालले आहे याचे अवलोकन करण्यास तो नम्रपणे झुकून लवतो. आपण जे पतित पापी आणि बंडखोर अशा आपली तो किती दखल घेतो बरे! म्हणजे त्याचे हे आपल्यावर कृपा करून उच्च पातळीवरून निचावस्थेवर येणे आणि झुकून लवणे किती थोर आहे ! हा वैभवी व्यक्तिमत्व असणारा आपली फक्त दखल घेतो असे नाही तर आपल्या बरोबर राहण्यासाठी येतो. आणि केवळ आपल्याबरोबर वसती करण्यासाठी येतो एवढेच नाही तर तो आपल्यापैकी एक बनतो असाच याचा नक्की अर्थ नाही का? किती अद्भुत गोष्ट आहे ही! मग आपले पाप व अपराध वाहून नेण्यासाठी त्याने वधस्तंभापर्यंत आज्ञापालन करून आपला प्राण दिला!

परमोच्च स्थानी असल्याने त्याच्या आपल्यामध्ये असणाऱ्या अमर्याद अंतरामुळे केवळ त्याच्या मेहरबानीने उच्चपदावरून नीच पदावर येण्यातील त्याची तेजस्वी गुणवत्ताच फक्त दिसून येते असे नाही तर त्याच्या अमर्याद साठ्यामुळे आणि त्याच्या व्यक्तिमत्वातील अत्त्युतम गुणांमुळे देखील ती दिसून येते. त्याला कशाचीच गरज पडत नाही. तो त्याच्या स्वभावविशेषांमध्ये आणि गुणवत्तेमध्ये परिपूर्ण आहे. तो कधीच दु:खी किंवा अतृप्त नसतो की ज्यामुळे त्याला कशाची तरी गरज पडावी. रोम ११: ३४-३५ मध्ये म्हटले आहे, “प्रभूचे मन कोणी ओळखले आणि त्याचा मंत्री कोण होता? त्याला प्रथम देऊन त्याची फेड मिळेल असा कोण आहे?” या वचनातील प्रभूचे मन कोणी ओळखले आणि त्याचा मंत्री कोण होता या शब्दप्रयोगाकडे लक्षपूर्वक पहा. देवाला कधीच पेच पडला नाही की त्याला सल्लामसलतीसाठी मंत्र्याची गरज भासावी. घडलेल्या घटनांमुळे तो कधीच गोंधळून गेला नाही व काय चुकले आहे असा प्रश्न त्याला पडला नाही. तो असे

कधीच म्हटला नाही की "असे का घडले मला कळत नाही. त्याला कोणी सल्ला देण्याची गरज भासली नाही. त्याला अधिक माहिती समजण्याची निकड पडली नाही. त्याला काही शिकण्याची आवश्यकता वाटली नाही. कारण त्याला सर्व प्रकारचे पूर्ण ज्ञान आहे. त्याला अजिबात कशाचीच गरज भासत नाही. पुढे या वचनात म्हटले आहे, "प्रथम देऊन त्याची फेड मिळेल असा कोण आहे?" दुसऱ्या शब्दात त्याला गरज वाटेल असे काही दुसऱ्या कोणाजवळ तरी आहे असे कधीच झाले नाही. त्याने अशी कोणतीही गोष्ट कोणाकडून प्राप्त करून घेतली नाही की ज्यासाठी तो त्या व्यक्तीचा ऋणी आहे. तो कुणाच्याही ऋणात नाही. त्याला कधी कशाची कमतरता भासली नाही किंवा तो कधी दु:खी झाला नाही अगर अतृप्त राहिला नाही की कोणाकडून काही प्राप्त करून घेण्याची त्याच्यावर वेळ आली नाही. उलट त्याला कशाचीच गरज पडत नाही. तो पूर्णपणे स्वसंतुष्ट, स्वयंपूर्ण असलेली व्यक्ती आहे आणि शिवाय आपल्याहून अमर्याद अशा परमोच्च उंचीच्या अंतरावर आहे. यामुळे ख्रिस्त थोर आणि गौरवी व्यक्ती ठरतो की नाही?

यामुळे आपण पुन: फिलीपै २ कडे वळू या. अनुग्रह करून परमोच्च पातळीवरून नीचावस्थेकडे येण्यास तो खाली आला, लवून नम्र झाला. ही वचने यामध्ये असणाऱ्या गौरवाविषयी बोलतात.

त्यामागे असलेल्या प्रेरक शक्तीने तो गौरवी ठरतो एवढेच  नाही तसेच त्याच्या तेजस्वीतेच्या पातळीने तो गौरवी ठरतो एवढेच नाही तर त्याने आपल्या अस्तित्वाला जे वळण दिले त्यामुळे तो गौरवी ठरतो. फिलीपै २:६, ७ या वचनांमध्ये पुढे म्हटले आहे, "त्याने स्वत:ला रिक्त केले म्हणजे मनुष्याच्या प्रतिमेचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले." एवढेच त्याला पुरेसे वाटले नाही म्हणून पुढे म्हटले आहे, "आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन म्हणजे प्रत्यक्षात मानव बनून पुढे त्याने स्वत:ला अधिक लीन व नम्र केले." 'त्याने आज्ञापालन केले.' आपल्या ऐवजी तो आज्ञाधारक बनला. आपल्या बंडखोरीच्या बदली तो आज्ञांकित झाला. "त्याने मरण आणि ते ही वधस्तंभावरचे मरण सोसले. येथपर्यंत त्याने आज्ञापालन केले."

रोमी राजवटीत सर्वांना वधस्तंभाची कल्पना होती. ते अत्यंत अटल गुन्हेगार पुरुषाला वधस्तंभी देत. तो आकाश व भूमीच्या मध्ये अधांतरी टांगला जाई. अत्यंत अधम गुन्हेगार असल्याने देवाने त्याच्यावर प्रहार केला आहे असे समजले जाई. (यात अद्भुत , थोर व गौरवी सत्य आहे. ) हे गुन्हेगार इतके दुष्ट व अधम असत की त्यांना नगरच्या बाहेर तटबंदीच्याबाहेर नेऊन ठार करण्यात येई. ख्रिस्ताला नगराबाहेर अत्यंत अधम गुन्हेगार लेखून ठार करण्यात आले.

आपण किती नम्र असायला हवे; किती सहनशील असायला हवे; किती दयाळू असायला हवे; त्याच्यावर किती विश्वास ठेवणारे असायला हवे, त्याचा किती आदर व सन्मान करण्याची इच्छा बाळगणारे असायला हवे. यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे सर्व घडत असताना या संपूर्ण प्रसंगी त्याने आपला दैवी स्वभाव जतन केला. त्याने जेव्हा स्वत:ला रिक्त केले  तेव्हा त्याने आपल्या देवत्वाचे सादरीकरण करण्यापासून, देवत्व दर्शविण्यापासून स्वत:ला रिक्त केले. योहानाच्या शुभवर्तमानातही गोष्ट प्रकर्षाने दिसून येते. उदाहरणार्थ; यहूदी लोक जेव्हा येशूला दगडमार करायला निघाले तेव्हा त्याने त्यांना प्रश्न केला, "मी पित्याची पुष्कळशी चांगली कृत्ये तुम्हांस दाखवली आहेत त्यातल्या कोणत्या कृत्यामुळे तुम्ही मला दगडमार करता?" यहुद्यांनी उत्तर दिले, "चांगल्या कृत्यांसाठी आम्ही तुला दगडमार करीत नाही तर दुर्भाषणासाठी कारण तू मानव असून स्वत:ला देव म्हणवतोस यासाठी" (योहान१०:३२,३३). तो देव असूनही त्याच्याकडे त्यांनी केवळ मानव म्हणून पाहिले. त्याच्या ठायी असलेले गौरव त्यांनी पाहिले नाही. त्यांना त्याच्यामध्ये काही गौरवी असे काहीच आढळले नाही. आजही हे सत्य आहे. ख्रिस्ती जनांना तो मोलवान वाटतो. पण इतर जे त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत, अशांसाठी तो अडखळण्याचा धोंडा आहे. ठेचाळण्याचा खडक आहे. त्याच्या ठायी त्यांना काहीच आढळत नाही...फार तर त्यांच्या दृष्टीने तो दुसरा एक महंमदच आहे. पण ज्यांना पाहणारे नेत्र प्राप्त झाले आहेत, ज्यांना आकर्षून घेण्यात आले आहे आणि ज्यांची खात्री पटली आहे; त्यांच्यासाठी मात्र तो गौरवी आहे. तो गौरवी असण्या पलीकडचा आहे. खरे तर ख्रिस्ती जीवनात या गौरवाची झलक रोज वाढत्या प्रमाणात दृष्टीस पडत राहते. म्हणूनच त्याच्या अस्तित्वाने घेतलेल्या

वळणामध्ये त्याचे गौरव आहे. त्यामध्ये तो मानव झाला आणि गुन्हेगाराचे मरण त्याने स्वीकारले. ही त्याची स्वत:ला नम्र करण्याची कृती आहे. हे करीत असता त्याने आपले गौरव बाजूला ठेवले. मानवत्व धारण करण्याची ती कृती होती. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर तो स्वत: जे नाही ते तो झाला. पण हे करीत असता तो जे होता ते त्याने सोडले नाही अगर थांबवले नाही. हेच त्याच्या परमोच्च स्थानावरून लवून खालच्या पातळीवर येणारे गौरव आहे.

## क) आपल्या लोकांसाठी देहधारी होण्याच्या परिणामामधील त्याचे गौरव.

शेवटची बाब म्हणजे आपल्या लोकांसाठी देहधारी होण्याने झालेल्या परिणामांमुळे तो गौरवी ठरतो.

पहिला परिणाम म्हणजे त्याच्या देहधारी होण्याद्वारे त्याने आपल्या व्यक्तित्वाचे व कार्याचे गौरवी प्रकटीकरण केले. खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीला प्रथम त्याचे व्यक्तित्व आकर्षित करून घेते. त्याच्या पवित्र आत्म्याचे कार्य ख्रिस्ती व्यक्तीमध्ये झाल्याने पवित्र आत्मा त्यांना ख्रिस्ताचे दर्शन घडवतो. परंतु तो जो कोणी आहे तेवढ्याच गोष्टीने ख्रिस्ती व्यक्तींना तो गौरवी दिसतो असे नाही तर त्याने जे काही केले त्यामुळेही त्यांना तो गौरवी दिसतो. त्याचे लोक त्याच्या व्यक्तित्वाचे गौरव पाहतात. "ज्यांचा नाश होत आहे" ते विश्वास ठेवत नाहीत म्हणून नाश पावतात. "कारण या युगाच्या देवाने त्यांची मने आंधळी केली आहेत. यासाठी की 'ख्रिस्ताच्या तेजाच्या (गौरवाच्या) सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये" (२ करिन्थ ४:३-४). हरवलेले जन ख्रिस्ताचे  गौरव दिसू नये म्हणून अंध केले आहेत. तरीही देवाने आपल्या लोकांना आपल्या गौरवाचे प्रकटीकरण केले आहे.

ख्रिस्ताच्या देहधारी होण्याचा दुसरा परिणाम म्हणजे तो आपल्या लोकांचा खडक व पक्का, भक्कम पाया असा आहे. तो देव – मानव या नात्याने आपल्या लोकांसाठी अढळ खडक आहे. या महान सत्याला अधोलोकाची द्वारेही विरोध करतील, पण त्यांचे काही चालणार नाही व ते यशस्वी होणार नाहीत. मत्तय १६:१८

मध्ये येशूने म्हटले, "आणखी मी तुला सांगतो की, तू पेत्र आहेस आणि या खडकावर मी आपली मंडळी रचीन आणि तिच्यापुढे अधोलोकांच्या द्वारांचे काही चालणार नाही." दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर अधोलोकांची द्वारे ख्रिस्ताचे व्यक्तित्व व गौरव यावर हल्ले करतील पण त्यांची सरशी होणार नाही. या लोकांना येशूने विचारले, "लोक मला कोण म्हणून म्हणतात?" ते म्हणाले, "कित्येक यिर्मया म्हणतात; कित्येक बाप्तिस्मा करणारा योहान मेलेल्यांतून उठून आला आहे असे म्हणतात." अनुवाद १८ मध्ये एक थोर संदेष्टा येण्यासंबंधीचे भाकीत केले आहे. ख्रिस्ताने विचारले, "पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?" ते म्हणाले, "आपण तर ख्रिस्त जिवंत देवाचे पुत्र आहा." ख्रिस्त हा निर्मिती आहे असे त्यांना नक्कीच म्हणायचे नव्हते. तर त्याच्या ठायी देवत्वाचे सर्व गुण आहेत असेच त्यांना म्हणायचे होते. ख्रिस्ताच्या पुत्रत्वात देवपित्याशी सादृशता आहे. त्याचे देवपित्याशी असलेले संबंध एकमेव आणि अपवादात्मक असे आहेत. ख्रिस्ताची देवपित्याच्या स्वभावाशी सादृशता आहे ...तू देवाचा पुत्र आहे असे त्यांनी जाहीरपणे घोषित केले! 'तुझा स्वभावविशेष, तुझे अस्तित्व हेच प्रदर्शित करते की तुझ्या ठायी देवाचा स्वभाव आहे. तू देवाचा पुत्र आहेस' अशी त्यांनी कबुली दिली. आम्ही समुद्र उगा राहिल्याचे पाहिले, आम्ही मृत जिवंत होत असेलेले पाहिले. कधी कोणी मनुष्य बोलला नाही अशी वचने तुझ्या मुखातून आम्ही ऐकली. गावोगावी आपल्या दुर्बलतेत वावरणाऱ्या लोकांमधून जा ये करीत असता संपूर्ण गावेच्या गावे तू आपल्या स्पर्शाने आरोग्य देऊन बरी केल्याचे आम्ही पाहिले. तू जिवंत देवाचा पुत्र आहेस! तू देहधारी होऊन आलेला देव आहेस!' मग ख्रिस्त म्हणाला, "शिमोन बार्योना धन्य तुझी, कारण मांस व रक्त यांनी नव्हे तर माझ्या स्वर्गातील पित्याने हे तुला प्रगट केले आहे" (मत्तय १६:१७). (हे प्रकटीकरण तुला तुझ्या कुवतीने प्राप्त झाले नाही.) हा देहधारी देव मंडळीचा खडक आहे आणि त्यावर सैतान हल्ला चढवील. पण असे म्हटले आहे की, 'अधोलोकांच्या द्वाराचे काही चालणार नाही.' खरे तर अधोलोकाची द्वारे ख्रिस्ताच्या गौरवावरच हल्ला करतात; असाच त्याचा मथीतार्थ आहे. सर्व मंडळीच्या इतिहासात सर्व पाखंडी मते, मंडळीतील सर्व समस्या ही मुळात त्याच्या गौरवाचा गैरअर्थ लावल्याचे परिणाम दिसतात. म्हणजे

त्याचे व्यक्तिमत्व कमी लेखणे, त्याला लपवणे, त्याला दिसेनासे करणे यात आढळते. परंतु तो म्हणतो की, त्यांचे काही चालणार नाही. म्हणून तो आपल्या विश्वासाचे विसाव्याचे स्थान आहे.

त्याच्या देहधारी होण्याचा परिणाम त्याच्या लोकांवर होतो तो म्हणजे यामुळे सैतानाचा समूळ नाश होतो. सैतानाची आठवण ठेवा. बायबल त्याला दैदिप्यमान, लूसीफर, तेजस्वी तारा सर्व आत्मिक जीवसृष्टींच्या निर्मितीमधील आणि देवदूतांच्या निर्मितीमध्ये जेष्ठ , त्या सर्वांमध्ये अत्युच्च संबोधते. या अभिषिक्त करूबाने ख्रिस्ताच्या स्वभावविशेषाविरुध्द बंड केले. ख्रिस्ताचे देवत्व व त्याच्या दैवी अधिकाराविरूद्ध बंड केले. तो म्हणाला मी त्याची सेवा करणार नाही तर मी त्याच्या समान होईन. म्हणून त्याने देवाच्या पुत्रासाठीच असलेले योग्य स्थान जेथे त्याला स्तुती, भक्ती, आराधना, वंदन आणि उच्च पद व गौरव प्राप्त होते त्याविरुध्द त्याने बंड केले. त्याने प्रत्यक्षात देवाविरुध्द बंड केले. मग जेव्हा देवाने मानव निर्माण करून त्याला एदेन बागेत ठेवले तेव्हा सैतानाने बागेत प्रवेश केला आणि मानवाच्या स्वभावाचा नाश केला. म्हणजे त्याने दैवी स्वभाव व अधिकाराविरुध्द बंड केले आणि मग मानवाच्या स्वभावाचा नाश केला. म्हणून देवाने ख्रिस्त या एकाच व्यक्तीच्या ठायी मानवी व दैवी स्वभाव ठेवले आणि सैतानाचा नाश केला. देवाने सैतानाची पापावर जी पकड आहे तिचा बिमोड केला. त्याने मरणाचे सामर्थ्य मोडून टाकले. आणि तुम्ही देवाला भेटू शकला कारण तुमच्या पापांची बंधने त्याने तोडून टाकली हे तुम्ही जाणता. ख्रिस्ती विश्वासी म्हणून आपण हे जाणतोच की त्याच्या देहधारी होण्यामागे मुक्ती किंवा तारण देणे हाच उद्देश होता. मुक्तीसाठीच देहधारणाची रचना करणे हा उद्देश होता. आपल्याला ठाऊक आहे की पापाची आडभिंत आपल्याला पलीकडे जाऊ देत नाही. बायबल आपल्याला हे सांगतेच. आणि त्याविषयी आपल्याला जागृत करण्यात आले आहे. देवाला पापाची इतकी चीड आहे की त्यामुळे तयार झालेली आडभिंत मानव दूर करू शकत नाही. तुम्ही स्वत:चे तारण करू शकत नाही. तुम्ही स्वत:मध्ये सुधारणा करू शकत नाही. तुम्ही सद्वर्तन करून पाप दूर करू शकत नाही. तुम्हांला दूर करता येत नाही अशी ती पापाची आडभिंत आहे. आपल्याला देखील हे ठाऊक आहे की प्रत्येक मनुष्यावर

देव न्याय आणील. म्हणजे प्रत्येक स्त्री पुरुष, मुलगा, मुलगी यांचा न्याय होईल. बायबल तसे सांगते आणि कालवरीमुळे आपल्याला ठाऊक आहे की ते सत्य आहे. पापानेच ही आडभिंत तयार केली. त्याने ही नैतिक आडभिंत तयार केली, ती ओलांडताच येत नाही. कोणीही व्यक्ती स्वत:चे तारण करू शकत नाही. कारण प्रत्येक व्यक्ती अशा अनेक गोष्टीनी व्याप्त आहे की ज्यापासून तिला सुटका हवी आहे. योहानाच्या प्रकटीकरणातील ५व्याअध्यायात बायबल सांगते की योहानाने सिंहासनावर बसलेल्या देवपित्याच्या हातात एक गुंडाळी पहिली. ती गुंडाळी घेऊन उघडण्यासाठी कोणीच पात्र नव्हता. ती गुंडाळी  पृथ्वीची मुक्ती व सुटका यांचे प्रतिनिधीत्व करणारी होती. कोणीही त्यासाठी साजेसा नव्हता म्हणून योहान रडू लागला. तेव्हा एक वडील जन त्याच्याकडे येऊन त्याला म्हणाला, “रडू नको; पाहा यहूदा वंशाचा सिंह व दाविदाचा अंकुर याने जय मिळवला आहे.” तोच केवळ स्वर्गात व पृथ्वीवर एक असा आढळला कारण तो पापात पतन पावलेला मानव नव्हता. तो देवमानव आहे - देव मानवी स्वभावात आलेला आहे यासाठी की मानवाचे त्याला तारण करता यावे आणि त्याचवेळी देवालाही संतुष्ट करता यावे. तो जणू काही देव व मानव यांना पुलाप्रमाणे जोडणारा दुवा आहे. त्यामुळे पापी त्यावरून पलीकडे जाऊ शकतील. तोच एकमेव मार्ग आहे आणि ख्रिस्ती जनांना ही गोष्ट माहीत आहे. त्याची कृपा व दया ही अमर्याद आहे. तो आता आपला आश्रय व विसाव्याचे ठिकाण आहे. यशया ८:१४ वर जॉन ओवेन देताना ‘तो तुम्हांस पवित्रस्थान देईल’ या वाक्याविषयी असे म्हणतात:

तो पवित्र स्थान आहे. जे कोणी तेथे येतील त्यांच्यासाठी ते खात्रीचे आश्रयस्थान आहे. संकट, क्लेशात असणाऱ्या मानवाला या पवित्रस्थानी काय सापडेल? तर त्याला हव्या असलेल्या सर्व गोष्टींचा पुरवठा, सर्व भयांपासून सुटका, प्रत्येक धोक्यापासून बचाव यांची तो अपेक्षापूर्ती करील. प्रभू येशू पापाने त्रस्त झालेल्या जिवांसाठी असाच आहे. सर्व आत्मिक क्लेश व अस्वस्थतेमध्ये तो आमचा आश्रय आहे. आपण पापाच्या जाणीवेच्या ओझ्याने दडपून गेलो आहोत का? मोह परीक्षांमुळे आपण पेचात पडलो आहोत का? कोणत्याही आत्मिक शत्रुमुळे दबून वाकून गेलो आहोत का? कोणत्याही कारणाने आपण अंधारात चालत असून

आपल्या ठायी प्रकाश नाही का? ख्रिस्ताच्या गौरवाचे दर्शन आपल्याला दिलासा देईल, आधार देईल व आपल्याला हायसे वाटेल. तो आपल्यासाठी काय करणार नाही? ज्याने स्वत:ला रिक्त करून नम्र व लीन केले, ज्याने स्वत:चे विशेष हक्काचे गौरव व आपल्या अमर्याद समृद्धीत असताना त्या परमोच्च स्थानावरून खालच्या पातळीवर येण्याची अमर्याद कृपा केली व लवून नम्र होऊन स्वत:ला रिक्त केले यासाठी की आपल्यासाठी त्याला मध्यस्थी करता यावी; तो आपल्याला सर्व संकट क्लेशातून सोडवणार नाही का? आपण गरजेने उभे असता तो आपल्यासाठी अभय देणारे पवित्रस्थान होणार नाही का? आपल्यावरील त्याच्या अमर्याद अनुग्रहामुळे जो संकटग्रस्त मानवांसाठी परमोच्च पातळीवरून काही निचावस्थेत आला त्याच्या सामर्थ्याविषयी आपल्याला भय धरण्याचे काहीच कारण नाही. सर्वसमर्थ देव म्हणून त्याने आपले सामर्थ्य अजिबात गमावलेले नाही. त्याची गौरवी कृपा व अमर्याद ज्ञान ही त्याने गमावलेली नाहीत. युगारंभापूर्वीपासूनचा देव म्हणून जे काही तो करू शकतो, ते सर्व आता तो देखील करू शकतो. त्यामुळे क्लेशयुक्त पापी जनांसाठी जर अभय देणारे पवित्रस्थान रचायचे झालेच तर ते सर्व अगर कोणत्याही बाबींसाठी ख्रिस्त येशूमध्येच तयार केलेले आहे.

अजूनही तो जो पूर्वी होता तोच देव आहे. त्याने आपला दैवी स्वभाव गमावलेला नाही. त्यामुळे या देवमानवाठायी अभय देणारे पवित्रस्थान असून तो आपला मध्यस्थ आहे ही गोष्ट मला विलक्षण अद्भुत वाटते. माझे तारण होऊन काही काळ लोटला आहे त्यामुळे देवाच्या वचनानुसार हे सत्य आहे हे सिद्ध झाले आहे. तो मला कधीच सोडणार नाही व टाकणार नाही. स्तोत्रामध्ये काही वचने अशी आहेत: “मी तुला वृद्धपणातही फलद्रूप करीन . तुझ्या उतारवयात तुझी भरभराट करीन. तू वृद्धपणीही रसभरीत व टवटवीत असशील.कल्याण व दया तुला आयुष्यभर लाभतील.”